सकाळ | मुंबई

मंगळवार । १२ ऑक्टोबर । २०१०

TODAY

# कॉस्मेटिक सर्जरी ऑन डिमांड!

## गर्दीत उठून दिसण्यासाठी तरुण मंडळींचा आटापिटा

सकाळ वृत्तसेवा

मुंबई : नवरात्रोत्सवाच्या सोहळ्यासाठी होणाऱ्या गर्दीतही आपला लुक 'हटके' असावा आणि आपण चारचौघांमध्ये उठून दिसावं यासाठी युवामंडळी विविध प्रकारच्या कॉस्मेटिक सर्जरी करून घेण्यास पसंती देऊ लागली आहे. वरं, या शस्त्रक्रिया थोड्या महागड्या असल्या तरीही त्यामुळे मिळणाऱ्या नव्या लुकमुळे वीस ते पस्तीस वयोगटातील मंडळींनी शहरांतील कॉस्मेटिक सर्जनकडे गर्दी करायला सुरुवात केली आहे.

चेहऱ्यावर असणारे जुने व्रण, मुरमांमुळे राहिलेले डाग, कपाळावरचं गोंदण नाहीसं करण्यासाठी ही मंडळी उत्सुक आहेतच; पण डोक्यावरच्या उडालेल्या 'छपरां'मध्ये नव्या केसांचे प्रत्यारोपण करून घेण्याचाही या दिवसांमध्ये अनेक जणांचा प्रयत्न दिसतो. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत सणासुदीच्या काळामध्ये या अल्पावधीत होणाऱ्या शस्त्रक्रिया करून घेण्याचे प्रमाण दुपटीने वाढले आहे. अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे अगदी कमी वेळेत या




शस्त्रक्रिया पार पडतात. या शस्त्रक्रियांमुळे चेहऱ्यावरचे दोष दूर होतात. त्यामुळे नवरात्रीपासूनच कॉस्मेटिक सर्जरी करून घेण्याचा कल अधिक वाढीस लागतो, असा अनुभव शहरातील कॉस्मेटिक सर्जन व्यक्त करतात. ब्रीच कॅन्डी रुग्णालयातील डॉ. मोहन थॉमस यांनी दिलेल्या माहितीनुसार नवरात्रीनंतर दसरा, दिवाळीचे वेध लागतात. या सणासुदीच्या काळात २० ते ३५ वयोगटातील मंडळी या शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी येतात. या शस्त्रक्रियांना 'लंच टाईम सर्जरी' देखील म्हटले जाते. कारण त्या अल्पावधीत होतात. चेहऱ्यावरील सुरकुत्या घालविण्यासाठी येणाऱ्या मंडळींची संख्या जितकी असते, तितकीच गालावरील खळ्या, हनुवटीवरील रेषा अधिक उजळ करण्यासाठी; तसेच त्वचा पॉलिश करून घेण्यासाठी येणारे तरुण, तरुणींपेक्षाही जास्त आहेत. बोटॉक्स या पद्धतीमध्ये, गालातील पेशीद्रव्य अधिक कार्यरत करून ते लालेलाल कसे दिसतील याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे बोटॉक्स या महागड्या तंत्रज्ञानाला अगदी मध्यमवर्गातील युवामंडळीदेखील प्राधान्य देताना दिसतात.

या कॉस्मेटिक सर्जरीमध्ये केवळ चेहऱ्याच्या मेकओव्हरकडे लक्ष दिले जात नाही; तर सुदृढ बांधा व अतिरिक्त चरबी काढून टाकणाऱ्या नानाविध शस्त्रक्रियादेखील या काळात केल्या जातात.

साठलेली चरबी काढून टाकण्याच्या प्रक्रियेला लिपोसक्शन सर्जरी म्हणतात. कमरेभोवती साठलेली अतिरिक्त चरबी काढून टाकण्यासाठी केल्या जाणाऱ्या या शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी मुलींचे प्रमाण आता वाढू लागल्याचे बॉम्बे रुग्णालयातील डॉ. वनिता अय्यर यांचे निरीक्षण आहे. हौसेला मोल नसते, हे खरे आहेच; पण उत्सवाच्या निमित्ताने मोलाच्या कायेचा हा मेकओव्हर हेच पुन्हा दर्शविते!